आकाशवाणी पुणे
प्रादेशिक वृत्त विभाग
पुणे वृत्तांत
वेळ-संध्याकाळी 06.00 वा.

दिनांक : 08.11.2026 **वार : रविवार**

नरक चतुर्दशी-लक्ष्मीपूजन

दिवाळीच्या मंगलमय पर्वातील नरक चतुर्दशी आणि लक्ष्मीपूजनाचा सण आज सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. आकाशकंदील, रांगोळ्या आणि पणत्यांनी घरे सजली आहेत. लक्ष्मीपूजनाच्या मुहूर्ताची सर्वत्र लगबग दिसून येत आहे. बाजारपेठांही दिव्यांच्या आकर्षक रोषणाईने उजळून निघाल्या आहेत.

उस गाळप

राज्यातील यंदाच्या ऊस गाळप हंगामात कालअखेर १३८ साखर कारखान्यांनी गाळप सुरू केले. या कारखान्यांनी आतापर्यंत एक कोटी ३२ लाख टनाहून अधिक उसाचे गाळप करत १०८ लाख ७३ हजार क्विंटल साखरेचे उत्पादन घेतले आहे. पुणे विभागानं ३७ लाख ३२ हजार टन उसाचे गाळप करत राज्यात आघाडी घेतली आहे.

आंबा हंगामाला सुरुवात

लक्ष्मीपूजनाच्या मुहूर्तावर आज पुण्यात आंब्याच्या हंगामाला सुरुवात झाली. गुलटेकडी इथल्या कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये हंगामातील पहिल्या मानाच्या आंब्याच्या पेटीचा लिलाव करण्यात आला. रत्नागिरी आणि देवगड येथून आलेल्या या पेटीला ४१ हजार रुपयांची सर्वाधिक बोली मिळाली. या लिलावात सात पेट्यांचा समावेश होता. दुसऱ्या पेटीला २२ हजार रुपये, तर अन्य पेट्यांना अनुक्रमे १० हजार आणि सात हजार रुपये भाव मिळाला.

धरण पाणीसाठा

महाराष्ट्रातील धरणांमधील एकूण उपयुक्त पाणीसाठा ६५ पूर्णांक ७९ टक्क्यांवर आला आहे. राज्य जलसंपदा विभागाने आज प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार, राज्यातील तीन हजार ४२ प्रमुख, मध्यम आणि लघु प्रकल्पांमध्ये २६ हजार ९७९ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा उपलब्ध आहे.
गेल्या वर्षी याच दिवशी धरणांमध्ये ९० पूर्णांक ६७ टक्के पाणीसाठा होता. त्यामुळे यंदा पाणीसाठ्यात सुमारे २५ टक्क्यांची घट नोंदवण्यात आली आहे. पुणे विभागात ७६ पूर्णांक ३२ टक्के पाणीसाठा आहे.

प्राध्यापक भरती

राज्यातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांमधील सहाय्यक प्राध्यापक पदाच्या भरतीसाठी नेट, सेट किंवा नियमानुसार प्राप्त केलेली पीएच.डी. यापैकी एक शैक्षणिक पात्रता आवश्यक असल्याचं उच्च आणि तंत्रशिक्षण विभागानं स्पष्ट केलं आहे. त्यानुसार, नियमानुसार पीएच.डी. पदवी प्राप्त केलेल्या उमेदवारांना नेट किंवा सेट परीक्षेतून सूट मिळणार आहे.
राज्यातील सर्व उच्च शिक्षण संस्थांनी या स्पष्टीकरणानुसार भरती प्रक्रिया राबवावी, असे निर्देश विभागानं दिले आहे.

दुष्काळग्रस्तांना कामे

पुणे जिल्ह्यातील १० तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला असून, या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील मजुरांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी नरेगा अंतर्गत कामांना गती देण्याचे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले आहेत.

दुष्काळी परिस्थितीत ग्रामीण भागातील रोजगाराची वाढती मागणी लक्षात घेऊन संबंधित यंत्रणांनी तातडीने नियोजन करून कामे सुरू करावीत,रोजगार हमी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कालबद्ध कृती आराखडा तयार करण्यावर भर द्यावा. तसंच, ग्रामपंचायत आणि तालुकानिहाय रोजगार मागणी, उपलब्ध कामे आणि मंजूर कामांचा आढावा घेऊन दैनंदिन उद्दिष्टांसह कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.
दुष्काळ निवारणाच्या दृष्टीने जलसंधारणाची कामे प्राधान्याने हाती घेण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

मेट्रोतील सायकलबंदी मागे

पुणे मेट्रोनं नियमावलीत बदल करत पिंक लाईन क्रमांक ३ वर सायकली नेण्यास घातलेली बंदी मागे घेतली आहे. त्यामुळे आता प्रवाशांना माण -हिंजवडी ते जिल्हा न्यायालय, शिवाजीनगर या २३ किलोमीटरच्या मार्गावर मेट्रो स्थानकांवर आणि मेट्रोच्या डब्यांमध्ये सायकल नेण्याची परवानगी मिळणार आहे. सायकलस्वारांना मेट्रो प्रवासादरम्यान सायकली सोबत नेण्यास परवानगी नसल्याने आयटी व्यावसायिक आणि सायकलप्रेमींनी नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतर प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे.

फटाके स्टॉल कारवाई

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर पुण्यात अनधिकृत फटाका विक्री करणाऱ्या स्टॉलवर महापालिकेनं कारवाई सुरू केली असून, सातारा रस्ता परिसरातील १९ स्टॉल हटवण्यात आले आहेत. सार्वजनिक जागांवरील अतिक्रमण आणि सुरक्षिततेच्या कारणांमुळे ही कारवाई करण्यात आल्याचं महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं. यंदा शहरात ११ ठिकाणी १८४ फटाका स्टॉलना परवानगी देण्यात आली आहे. नियमांचं उल्लंघन करणाऱ्यांवर पुढेही कारवाई केली जाणार असल्याचा इशारा अधिकाऱ्यांनी दिला आहे.

बॅडमिंटन

पुण्यात सुरू असलेल्या एसबीए कप राज्यस्तरीय १५ आणि १७ वर्षांखालील बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत नागपूरच्या आदित्य यउल याने दोन्ही वयोगटांच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. त्यामुळे त्याला दुहेरी विजेतेपदाची संधी निर्माण झाली आहे.
तर १५ वर्षांखालील मुलींच्या गटात पुण्याच्या कायरा रैना आणि ख्याती कत्रे यांनी, तर १७ वर्षांखालील मुलींच्या गटात पुण्याच्या शरयू रांजणे आणि रायगडच्या अनुष्का इप्ते यांनी अंतिम फेरी गाठली आहे

हवामान

पुणे आणि शहर परिसरात आज आकाश निरभ्र असून किमान तापमान 32 तर कमाल तापमान 15 पूर्णांक 2 अंश सेल्सिअस नोंदवण्यात आलं. उद्याही हवामानात फारसा बदल नसल्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता ताज्या पुणे वृत्तांतमध्ये नमस्कार.